# वसई-विरार शहर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

**दि.२४/०७/२०२६**

**घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ बाबत घाऊक कचरा निर्मात्यांसाठी (>१०० किलो प्रतिदिन कचरा निर्माण करणाऱ्या संस्था) मार्गदर्शन बैठक दि.०२ ऑगस्ट रोजी होणार**

घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ (SWM Rules, २०२६) च्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत महानगरपालिका क्षेत्रातील घाऊक कचरा निर्माते (Bulk Waste Generators) यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेली मार्गदर्शन व जनजागृतीपर बैठक काही अपरिहार्य प्रशासकीय कारणास्तव दि.२६ जुलै २०२६ **ऐवजी रविवार दि.०२ ऑगस्ट, २०२६** रोजी घेण्यात येणार आहे.

गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार यांनी अधिसूचित केलेले घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ दिनांक ०१ एप्रिल २०२६ पासून अंमलात आले असून सदर नियमांमध्ये घाऊक कचरा निर्मात्यांसाठी विस्तारित घाऊक कचरा निर्माते जबाबदारी (Extended Bulk Waste Generator Responsibility - EBWGR) तसेच स्रोतस्तरावर चार प्रकारे कचरा वर्गीकरण करण्याच्या महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील गृहनिर्माण संस्था, व्यावसायिक संकुले, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, हॉटेल्स, मंगल कार्यालये तसेच इतर घाऊक कचरा निर्माते यांच्यासाठी विशेष मार्गदर्शन बैठक आयोजित करण्यात आली आहे.

सदर बैठकीमध्ये घाऊक कचरा निर्मात्यांच्या जबाबदाऱ्या, ओला, सुका, स्वच्छताविषयक व विशेष काळजी घेणेयोग्य कचऱ्याचे स्रोतस्तरावरील वर्गीकरण, ओल्या कचऱ्याचे स्थानिक पातळीवरील प्रक्रिया व्यवस्थापन, EBWGR अंतर्गत नोंदणी प्रक्रिया, नियमांचे पालन न केल्यास लागू होणाऱ्या दंडात्मक तरतुदी तसेच महानगरपालिका व घाऊक कचरा निर्माते यांच्यातील समन्वय व अंमलबजावणी आराखडा याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व घाऊक कचरा निर्माते, गृहनिर्माण संस्था, व्यावसायिक आस्थापना, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, हॉटेल्स तसेच संबंधित प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

सदर बैठक वसई विरार शहर महानगरपालिकेचे सन्मा. महापौर महोदय, सन्मा. उप महापौर महोदय, सन्मा. आयुक्त महोदय व सन्मा. लोकप्रतिनिधी नगरसेवक यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येणार असून बैठकीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

बैठकीचा **सुधारित** दिनांक : **दि.०२ ऑगस्ट, २०२६ (रविवार)**
वेळ : **सकाळी १०.३० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत**
स्थळ : **तळ मजला, राजानी सभागृह, अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, नवघर, वसई रोड (प.)**